नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 03/09/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## जबरी चोरी करणाऱ्या आरोपीताविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत .जिवन विकास शाळा समोर उमरेड येथे दिनांक 01/09/2021 चे 20.22 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) अडडु उर्फ सादीक शेख, वय 30 वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड, 2) शुभम शेन्डे, वय 27 वर्ष, रा. उमरेड यांनी फोन करून फिर्यादी नामे– राहुल राजेंद्रप्रसाद गुप्ता, वय 32 वर्ष, रा. जागीठाणापेठ मनिष भोजनालय जवळ, उमरेड यांना म्हटले की, ''तु पोलिस स्टेशन मे मेरी तक्रार क्यु कर रहा है तु कहा है'' असे म्हणुन घटनास्थळी येवुन फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करून म्हणाला, 'बहोत मस्ती चढ गई है, बहोत टिव्ही मे छा रहा है मेरी कप्लेट किया है, पत्रकार खेल रहा है, आज तो हम तेरा गेम करेंगे' असे म्हणुन फिर्यादीस लोखंडी रॉडने डोक्यावर मारण्याचा प्रयत्न केला असता तो फिर्यादीने हुकवला. यानंतर आरोपीतांनी फिर्यादीस पकडुन हातबुक्यांनी मारहाण करून खिशातुन 2,200/–रू. आणि सोन्याची चैन झटका मारून तोडुन हिसकावली. फिर्यादी भितीपोटी तेथुन मित्रासोबत पळुन जात असतांना आरोपीतांनी 'पकडो साले को मारो' असे बोलत होते. फिर्यादी हे पो. स्टे उमरेड येथे दि. 16/08/21 रोजी येथे 10.00 वा. तक्रार देण्याकरिता आले असता पो.स्टे. उमरेड ग्रामीण रूग्णालय येथे उपचाराकरिता पाठवले ग्रामीण रूग्णालय उमरेड येथुन परत आल्यावर फिर्यादीस माहित पडले की, उमरेड पो. स्टे. उमरेड येथे त्याच्यावर गुन्हा क्र. 528/21 प्रमाणे विविध कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाल्याने फिर्यादी न देताच निघुन गेले. त्यानंतर फिर्यादी याने मा. अति. सत्र न्यायाधिश यांनी अग्रीम जमानत मंजुर केली व दि. 02/09/2021 रोजी पो. स्टे. ला येवुन फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 394, 294, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री तारूदत्त बोरसरे मो. क्र. 9764118811 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर